\\10.158.17.107\e\dc backup-30-05-2014\MHP-DC\DGP Appointment-2015\मुलाखतीचे पत्र.doc inward 820530/15

# जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली (उपचिटणीस शाखा)

पत्ता-राजवाडा आवार,सांगली, दुरध्वनी क्र-0233-2373063, Email ID- dcbranchsangli@gmail.com

क्रमांक-गृह-1/कार्या-6/एमएजी-1/1451/2015 दिनांक 28/05/2015

## आदेश

2/- जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, तसेच सहाय्यक सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, पदांसाठी सन 2015 मध्ये दिनांक 17/03/2015 ते 31/03/2005 या काळात अर्ज मागविणेत आले. त्यानंतर सध्या कार्यरत असलेल्या सहाय्यक सरकारी वकीलांसाठी वयाची अट 55 वर्षावरून 62 वर्षापर्यंत शिथिल करणेत आली व दि.15/04/2015 अखेर अर्ज दाखल करणेस मुदत वाढ देण्यात आली. वरील वाढीव कालावधीसह विहीत केलेल्या मुदतीत जिल्हा सरकारी वकील व सहायक सरकारी वकील पदासाठी एकुण 172 अर्ज प्राप्त झाले.

3/- प्राप्त अर्जांमध्ये काही अर्जदारांनी करपात्र उत्पन्नाचा रकाना कोरा ठेवला आहे. काही अर्जदारांनी No, Not applicable असे नमुद केलेले आहे. अर्जाचे छानणीमध्ये अर्जास आवश्यक (mandatory) बाबींचा छानणीवेळी विशेषतः विचार करणेत आला. सर्व अर्जाची रितसर छाननी करून दिनांक 25/05/2015 रोजी पात्र-अपात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. मूळ अर्जात नमूद केलेले अत्यंत आवश्यक व पर्यायी मुद्दे ठरविणेत आले. त्यामध्ये पासपोर्ट साईज फोटो व त्यावर स्वाक्षरी असणे आवश्यक आहे, अशी अर्जातच स्पष्ट अट होती. त्यामुळे प्राप्त अर्जांपैकी जिल्हा सरकारी वकील व सहायक सरकारी वकील या पदाराठीचे एकूण 61 अर्जदार अपात्र ठविणेत आले.

4/- दिनांक 26/05/2015 व 27/05/2015 रोजी अपात्र यादीतील एकूण 11 अर्जदारांनी आमचे अर्जाचा फेर विचार व्हावा व तांत्रीक मुद्यावर अर्ज फेटाळू नयेत अशी विनंती केली. प्रस्तुत अर्जादार यांचे अर्जाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | विनंतीचे कारण |
|---|---|---|
| 1 | शिंदे अविनाश लक्ष्मणराव | माझ्या अर्जावरील फोटोवर स्वाक्षरी करायचे नजर चुकीने राहीलेले आहे. तरी नैसर्गिक न्याय तत्वाचा सहानुभूतीपुर्वक विचार होवून संधी द्यावी अशी विनंती केलेली आहे. |
| 2 | गुजर सचिन सुभाष | |
| 3 | बामणे संगिता संभाजी | |

5/- वरील सर्व अर्जाचा विचार करून व अद्याप मुलाखती संपलेल्या नसल्यामुळे अर्जदार यांना तांत्रिक दृष्टया डावलणेत येऊ नये. त्यास संधी देण्यात यावी व नैसर्गिक न्याय तत्वाचा अंमल व्हावा या उद्देशाने वरील नमूद सर्व अर्जदारास मुलाखतीची संधी देण्यात यावी या निर्णयाप्रत मी आलो आहे. म्हणुन मी जिल्हाधिकारी सांगली खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

वरील सर्व अर्ज मान्य करण्यात येत आहेत व वर नमूद अर्जदार क्र. 1 ते 11 यांचे अर्ज त्यांनी अर्ज केलेल्या पदाकरीता पात्र ठरविणेत येत आहेत. त्यांना दिनांक 28/05/2015 रोजी सोयीच्या वेळी इतर मुलाखती बरोबरच संधी देण्यात यावी.

**ठिकाण** - सांगली
**दिनांक व वेळ** -28/05/2015, सकाळी -10.30 वा.

DISTRICT MAGISTRATE SANGLI

जिल्हाधिकारी सांगली